सं.फौ.के.नं. २१९/२०२०

नि. क्र. ४८

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ०४ चा जबाब**

**नाव** – सागर चंद्रकांत जाधव,

**वय**– ३० वर्षे, **व्यवसाय** – सध्या काही नाही, पुर्वी नोकरी,

**रा.** चाफवली, सरोदेवाडी, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**सरकारतर्फे सरतपास सरकारी वकील श्रीम. ए. व्ही. गुरुपादगोळ यांचेतर्फे –**

०१. सन २०२० साली मी चाफवली येथे आमच्या एकत्र कुटुंबात माझी पत्नी सानवी, आजी मालती, आत्या वेदीका, तीचा मुलगा यांच्या बरोबर रहायचो. माझा विवाह दि. २९/१२/२०१९ रोजी झाला. त्यावेळी मी चाफवली येथे आजीकडे रहायचो.

०२. दि. २९/०७/२०२० ला माझ्या पत्नीची तब्येत ठिक नसल्याने आम्ही तीचे माहेर वडवली, ता. राजापुर येथे गेलो होतो. तीला बरे वाटू लागलयाने आम्ही दि. ०१/०८/२०२० रोजी संध्याकाळी साडेसात पावणे आठच्या सुमारास पुन्हा चाफवली सरोदेवाडी येथे आलो. आम्ही खोलीचे कुलुप उघडले. कचरा झाल्याने साफसफाई करायला घेतली. बसण्यासाठी मी सुटकेसवर ठेवलेली चटई काढली. त्याचवेळी मला चटईमधून काहीतरी पडल्याचा आवाज आला. पाहीले असता तीथे एक बंद डबी दिसून आली. ती डबी उघडुन पाहीले असता सोन्याचे दागीने दिसून आले.

०३. मी , माझी पत्नी सानवीला ते दागीने तीचे आहेत असे विचारले त्यावेळी तीने ते दागीने तीचे नसल्याचे व तीने कधी तेथे ठेवले नसल्याचे सांगीतले.

०४.  मला हा सर्व प्रकर संशयास्पद वाटल्याने मी गावच्या पोलीस पाटलांना फोन करुन हकीगत सांगीतली. त्यांनी मला फोनवर मिळालेले दागीने तसेच ठेवणेस सांगीतले.

०५.  दुस–या दिवशी ०९.०० वाजता मी घरामध्ये दागीने कोणाचे आहेत अशी विचारणा केली. त्यामध्ये घरामध्ये मी, माझी पत्नी, आजी मालती जाधव, चुलते रमाकांत जाधव त्यांची पत्नी पल्लवी जाधव, आत्या वेदीका यादव व स्वाती यादव उपस्थीत होती. त्यावेळी पोलीस पाटील विजय चाळके तात्काळ त्या ठिकाणी आले. त्यांनी माझ्या आजीला ते दागीने कोणाचे आहेत ते ओळखायला सांगीतले. त्यावेळी माझ्या आजीने सांगीतले की, हे दागीने तीचे आणि तीच्या मयत पतीचे होते.

०६.  पोलीस पाटलांनी आजीला हे दागीने कोणाकडे ठेवायला दिले होते अशी विचारणा केली त्यावेळी तीने दागीने स्वाती यादव हीच्याकडे ठेवण्याकरता दिल्याचे सांगीतले. त्यावेळी स्वाती यादव हीने माझी आत्या वेदीका यादव हीच्या खोलीमध्ये ठेवलेली सुटकेस उघडुन तपासली व तीचे आणखी काही दागीने चोरीला गेल्याचे सांगीतले.

०७.  पोलीस पाटलांनी मला मिळून आलेले दागीने पोलिसांकडे सुपुर्त करण्याचा सल्ला दिला व पोलीसांकडे दाद मागण्यास सांगीतले.

०८.  मी सदरचे दागीने घेऊन जात असताना माझ्या चुलत्यांची पत्नी पल्लवी जाधव हीने चोर आहात असे म्हणत शीवीगाळ करायला सुरुवात केली. शिवीगाळ मला आणि माझ्या पत्नीला करण्यात आली. माझ्या आत्या वेदीका यादव हीने माझ्या पत्नीला 'तु वेश्या आहेस, तुला कोणीही दोन तीनशे रुपये दिले तर तु खुश होतेस' असे म्हणत शिवीगाळ केली. माझ्या चुलते रमाकांत जाधव यांनी माझ्या पत्नीला उद्देशून 'तुला पैशाची गरज असेल तर मी तुला पैसे देतो, तु शेजारी झोप' अशा शब्दांत शीवीगाळ केली.

०९. या घटनेनंतर मी आणि माझी पत्नी देवरुख पोलीस स्टेशनला दागीने घेऊन गेलो व माझ्या पत्नीने आरोपी क्र. १ ते ४ विरुध्द फिर्याद दिली. आज रोतजी आरोपी क्र. १ ते ४ न्यायालयात हजर आहेत. पोलिसांना मी या घटनेविषयी माहीती सांगीतली होती.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्रीम. पी. सी. चव्हाण यांचेतर्फे पुढील तारखेपर्यंत तहकुब –**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2024.06.22 15:38:14 +0530

**(श्रीमती एस.एच.पाटील)**

**दिनांक – २१/०६/२०२४** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख.**